## कॅमेरा लेन्स



**नांदेड :** महाराष्ट्रदिंनी झालेल्या कार्यक्रमात पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते पोलिस दलातील उत्कृष्ट सेवेबद्दल पोलिस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांचा सन्मान करण्यात आला.

# 'स्थागुशा'चे पोनि चिखलीकर यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रदान

देशोन्नती वृत्तसंकलन... 03/05/2023

**नांदेड** ■ महाराष्ट्रदिनी झालेल्या कार्यक्रमात पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते पोलिस दलातील उत्कृष्ट सेवेबद्दल पोलिस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांचा सन्मान करण्यात आला.

देशोन्नती

यावेळी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. बालाजी कल्याणकर, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, विशेष पोलिस महानिरीक्षक शशिकांत महावरकर, जि. प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर, पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, मनपा आयुक्त डॉ. सुनिल लहाने यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात चिखलीकर यांच्यासह संभाजी शिवभक्त, पोउपनि आनंद बिचेवार, श्रीकांत मोरे, शंकर भोसले, मिलींद बोडके, शिवसांब मठपती, अशोक वाव्हळे, श्रीराम हमंद, संजय शिरगिरे, आनंद हंगरगे, किरण अवचार, मारोती मुलगीर यांचाही पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.